# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोननं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

**प्रसेनोट क्र- ११३** **दिनांक ०७/०४/२०२३**

## ए.टी.एम. मशीन मधुन पैसे काढुन देण्याचा बहाना करुन हातचलाखीने ए.टी.एम. कार्डची अदलाबदली करुन फसवणुक करणा-या सराईत आरोपीतांना अटक गुन्हे शाखा कक्ष ३, विरार यांची कामगिरी.

दिनांक २२/०३/२०२३ रोजी रात्रौ. ०७:०० ते ०७.४५ वाजताचे दरम्यान फिर्यादी नामे श्री. रोहीत रामानंद राय, वय- १९ वर्षे, व्यवसाय- शिक्षण, रा. धानीवबाग तलाव, धानीवबाग, नालासोपारा पूर्व, ता.वसई, हे हिताची एटिएम, धानीवबाग तलावाचे समोर, धानीव बाग, नालासोपारा पुर्व, येथे एटीएम सेंटर मधुन पैसे काढण्यासाठी गेले असता दोन अनोळखी इसमांनी आपसात संगणमत करुन एटीएम सेंटरमध्ये येवून फिर्यादी यांना बोलण्यात गुंतवुन फिर्यादीचे एटीएम त्यांचे संमतीशिवाय लबाडीने घेवून फिर्यादीचे परस्पर ४४,०००/- रुपये काढले तसेच एटीएम सेंटरमध्ये आलेल्या आणखी एका इसमाचे १९,०००/- रुपये काढुन फसवणुक केल्याबाबत फिर्यादी यांनी तक्रार दिल्याने पेल्हार पोलीस ठाणेत गुन्हा रजि. नंबर २८८/२०२३ भा.द.वि.सं. कलम ४२०, ३४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता.

मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात गेल्या काही महिन्यांपासुन एटीएम सेंन्टर मधुन पैसे काढुन देण्यासाठी मदतीचा बहाणा करुन हातचलाखीने एटीएम कार्डची अदलाबदली करुन फिर्यादीचे परस्पर एटीएम मशीन मधुन पैसे काढुन घेतलेबाबतच्या घटनेत वाढ झाली होती. सदर घटनांची वरिष्ठांनी गांभिर्याने दखल घेवुन आरोपीत यांचा शोध घेवुन गुन्हे उघडकीस आणण्याबाबत सुचना व आदेश दिले होते.

त्याअनुषंगाने वर नमुद गुन्हयाचा तपास गुन्हे शाखा कक्ष ३, विरार यांचेकडे सोपविण्यात आला होता. गुन्हे शाखा कक्ष ३, विरार चे पो.नि. श्री. प्रमोद बडाख व स्टाफ यांना गुप्त बातमीदार व तांत्रिक विश्लेषणाव्दारे प्राप्त माहितीचे आधारे आरोपीत नामे १) साहील सलीम शेख, रा. ॲन्टॉपहिल, मुंबई. २) सागर अभिजीत मंडल, रा. बांद्रा पुर्व, मुंबई. यांस ताब्यात घेवुन तपास केला असता त्यांनी वर नमुद गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांना सदर गुन्हात दिनांक ०४/०४/२०२३ अटक करण्यात आली आहे. अटक आरोपीत यांचेकडुन गुन्हयात वापरण्यात आलेली बर्गमॅन मोटार सायकल व गुन्हयातील फसवणुक झालेली १,५०,०००/- रुपये रोख रक्कम हस्तगत करण्यात आली असुन अटक आरोपीत यांच्याकडे अधिक तपास करुन खालील ६ गुन्हे उघडकीस आणण्यात आले.

## -:उघडकीस आलेले गुन्हे:-

| अ.क्र | पोलीस ठाणे | गुन्हा रजि नंबर | कलम |
|---|---|---|---|
| १ | पेल्हार पोलीस ठाणे | २८८/२०२३ | भा.दं.वि.सं.कलम ४२०,३४ |
| २ | पेल्हार पोलीस ठाणे | ३०३/२०२३ | भा.दं.वि.सं.कलम ४२०,३४ |
| ३ | पेल्हार पोलीस ठाणे | ७७/२०२३ | भा.दं.वि.सं.कलम ४२०,३४ |
| ४ | तुळींज पोलीस ठाणे | २१०/२०२३ | भा.दं.वि.सं.कलम ४२०,३४ |
| ५ | शांती नगर पोलीस ठाणे (ठाणे शहर) | २५६/२०२३ | भा.दं.वि.सं.कलम ४२० |

| | | | |
|---|---|---|---|
| ६ | लालपुर/ पांण्डेयापुर पोलीस ठाणे (उत्तरप्रदेश जि. वरुणा ) | ६६/२०२३ | भा.दं.वि.सं कलम ४२०, ४०६ |

अटक आरोपीत यांचे विरुध्द मुंबई शहर पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील अंधेरी, भायखळा, डी.एन. नगर, साकीनाका, मालवणी या पोलीस ठाण्यांमध्ये यापुर्वी एकुण १२ गुन्हे दाखल आहेत. तसेच ठाणे शहर पोलीस आयुक्तालय व इकडील पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात अशाच प्रकारे अनेक गुन्हे केले असल्याची माहिती वर नमुद अटक आरोपीत यांनी तपसादरम्यान दिली आहे.

सदरची कामगिरी श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे सहायक पोलीस आयुक्त, (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाख कक्ष ३ चे पो.नि. श्री. प्रमोद बडाख, पो.उप.नि. शिवाजी खाडे, उमेश भागवत, पो.हवा. अशोक पाटील, मनोज चव्हाण, मुकेश तटकरे, ८ शंकर शिंदे, सचिन घेरे, सागर बारवकर, अश्विन पाटील, पो.अंम. राकेश पवार, सुमित जाधव, म.सु.ब. प्रविण वानखेडे, सागर सोनवणे, गणेश यादव, तसेच स.फौ. संतोष चव्हाण नेम सायबर गुन्हे शाखा यांनी केली आहे.




----oooo----